# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

# कृतिपुस्तिका

## इयत्ता - १० वी

### विषय - मराठी - संयुक्त भाषा (आंतरभारती)

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

बालचित्रवाणी शेजारी, भांबुर्डा, पुणे - ४११००४

# प्रस्तावना

सन २०१५-१६ मध्ये इयत्ता ९ वी च्या मराठी (प्रथमभाषा / द्‌वितीय भाषा व संयुक्त भाषा) भाषा विषयाच्या प्रचलित मूल्यमापन पद्‌धतीतील प्रचलित प्रश्नपत्रिकेचे स्वरूप बदलून ते कृतिपत्रिका या स्वरूपात करून मूल्यमापन पद्‌धतीत बदल करण्यात आला आहे.

मराठी भाषा विषयाच्या प्रचलित मूल्यमापन पद्‌धतीत प्रश्नपत्रिकेकडून कृतिपत्रिकेकडे असा करण्यात आलेला बदल प्रचलित पाठ्यपुस्तके न बदलता फक्त मूल्यमापन पद्‌धतीत केलेला आहे. हा बदल पाठांतराकडून – आनंददायी व कृतिशील अध्ययनाकडे नेणारा आहे.

सदर बदल सन २०१५-१६ पासून इ. ९ वी साठी लागू करण्यात आला होता. आता इ. १० वी साठी हा बदल सन २०१६-१७ पासून लागू करण्यात येत आहे. मार्च २०१७ ची इ. १० ची शालान्त प्रमाणपत्र परीक्षेची प्रश्नपत्रिका ही कृतिपत्रिका स्वरूपातच असेल.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात भाषेचे स्थान अनन्यसाधारण आहे. मराठी विषयाचा अभ्यास करताना 'मराठी' 'विषय म्हणून नव्हे' तर भाषा म्हणून अभ्यासला जाणे अधिक आवश्यक आहे. भाषा म्हणजे केवळ वाङ्मय / साहित्य यांचा अभ्यास, भाषा शिक्षण म्हणजे केवळ गद्य-पद्य-स्थूलवाचन – व्याकरण यांचे शिक्षण हा पारंपरिक दृष्टिकोन बाजूला ठेवून भाषेच्या विद्यार्थ्याने भाषेचा व प्रत्यक्ष आपल्या जीवनाचा संबंध जोडायला शिकले पाहिजे. भाषेच्या विविध अंगांचा अभ्यास करताना व्यावहारिक जीवनातील भाषेचे महत्त्व लक्षात घेऊन व्यावहारिक भाषा व भाषेचे व्यावहारिक उपयोजन या दोन्हीही बाबींसाठी विद्यार्थ्यांचा भाषिक विकास महत्त्वाचा ठरतो.

प्रचलित मूल्यमापन पद्‌धतीमध्ये प्रश्नोत्तर पद्‌धती हे महत्त्वाचे अंग असल्यामुळे पाठांतरावर आधारित उत्तरे लिहिण्याची विद्यार्थ्यांना झालेली सवय ही भाषिक विकास व भाषिक समृद्धी, अभिव्यक्तीक्षमता व भाषेचे व्यवहारात उपयोजन यांमध्ये म्हणजे एकूण भाषाशिक्षणातच मोठी अडसर ठरते. या उलट भाषा विषयाचे अध्ययन हे भाषिक अंगानी भाषासमृद्‌धीसाठी व्हावे या अनुषंगाने अध्यापन – अध्ययन प्रक्रियेत बदल घडावा यासाठी मूल्यमापन पद्‌धतीत सदर बदल करण्यात आला आहे.

प्रश्नपत्रिकेचे स्वरुप बदलून ते कृतिपत्रिका स्वरुपात करणे या बदलामागील प्रमुख उद्‌दिष्ट भाषेचा अभ्यास केवळ प्रश्नोत्तर स्वरुपात न राहता, घोकंपट्टी / स्मरण यांवर आधारित न राहता ज्ञान, आकलन, उपयोजन याबरोबर उच्च बोधात्मक क्षमतांचा विकास करुन विद्यार्थ्यांची चिकित्सक विचारक्षमता, निरीक्षण शक्ती, सृजनशीलता यांच्या अभिव्यक्तीक्षमतेचा विकास करणे हे आहे.

पारंपरिक अध्यापन पद्‌धतीमध्ये म्हणजेच वर्गातील एकांगी अध्यापन व आंतरक्रियेचा अभाव असलेली अध्यापन पद्‌धती यात बदल करून, ज्ञानरचनावादी विचारप्रणालीचा अंतर्भाव व स्वयंअध्ययनावर आधारित कृतिशील अध्ययन पद्‌धतीचा अवलंब शिक्षकांनाही करणे सदर बदलामुळे अपरिहार्य ठरेल.

मूल्यमापनातील बदलानुसार अध्ययन अध्यापन पद्धतीतील बदलासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न होतील व अशा 'कृतींवर आधारित अध्ययन' (ABL) पद्‌धतीमुळे अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक उत्तम व ताणरहित होईल.

भाषा विषयात विद्यार्थ्याने किती गुण मिळविले यापेक्षा भाषेचे किती गुण, क्षमता किंवा कौशल्ये आत्मसात केली यावर विद्यार्थ्यांचे भाषेतील यश जोखले / तपासले जावे यासाठी मूल्यमापन पद्धतीत सदर बदल महत्त्वाचा आहे.

## बदलाचे स्वरुप :-

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप पूर्णपणे बदलून ते कृतिपत्रिका स्वरूपात करताना आजमितीस प्रचलित असलेल्या पाठ्यपुस्तकात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.**

(२० गुणांच्या तोंडी परीक्षेच्या स्वरुपात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.)

पाठ्यपुस्तकामध्ये पाठांच्या खाली दिलेल्या स्वाध्यायाच्या अभ्यासाचे फक्त स्वरुप बदलले आहे. स्वाध्याय वगळला जाणार नाही. त्याचप्रमाणे व्याकरण, भाषाभ्यास, वाचन, उपक्रम या स्वाध्यायातील सर्व निर्दिष्ट घटकांचा अभ्यासही होणे आवश्यक आहे. फक्त तो कृतींच्या माध्यमातून व्हावा. केवळ वाचन व पाठांतरापुता मर्यादित न राहता स्वमतप्रकटीकरणावर व कृतिशीलतेवर भर देणारा असावा.

विद्यार्थ्यांनी संपूर्ण पाठ्यपुस्तक मनःपूर्वक वाचावे, अभ्यासावे. त्यातील आशयाचे आकलन करुन घेऊन आशय, विषयाच्या अनुषंगाने येणारे अधिकचे ज्ञान / समग्र माहिती आत्मसात करावी व मुख्य म्हणजे सदर विषयावर चिकित्सक विचार करून स्वमत प्रकटीकरणाचे कौशल्य प्राप्त करावे हा या संपूर्ण बदलामागील उद्देश आहे. केवळ कृतिपुस्तिकेचा अभ्यास करणे हे ही पुरेसे नाही हे विद्यार्थ्यांनी / शिक्षकांनी लक्षात घ्यावे.

विद्यार्थ्यांना जर विविध प्रकारच्या सृजनशील कृतींच्या द्वारा भाषा शिकण्याची संधी मिळत गेली तर त्यांच्यासाठी तो नक्कीच आनंदानुभव असेल.

## कृतिपुस्तिकेचे स्वरुप :-

त्यादृष्टीने पाठ्यपुस्तकातील घटकांवर कृती कशास्वरुपात तयार करता येतील यासाठी काही प्रातिनिधिक स्वरूपात दिशादर्शक, मार्गदर्शक कृतींचा संच म्हणून सदर कृतिपुस्तिका तयार करण्यात आली आहे. कृती पाठ्यपुस्तकातील घटकांवरच तयार करण्यात आल्या आहेत.

कृतिपुस्तिकेमध्ये कृतींची यादी व प्रातिनिधिक कृतींबरोबर नमुना कृतिपत्रिका दिलेली आहे. त्यानुसार शिक्षकांनी स्वतःच्या सृजनशील, चिंतन व अभ्यासाने अनेकविध कृती तयार कराव्यात. नमुना कृतिपत्रिका केवळ नमुन्यादाखल आहे. त्यात शिक्षकांनी कृतींच्या प्रकारांचे वैविध्य आणणे अपेक्षित आहे.

कृतीमध्ये आनंददायी अनुभव देणारे वैविध्य असावे. मुख्य म्हणजे प्रत्येक कृती तयार करताना ती तयार करण्यामागील भाषिक उद्दिष्ट व त्यातून कोणत्या कौशल्याचे मूल्यमापन करावयाचे आहे याची निश्चिती होणे, याचा विचार होणे आवश्यक आहे. त्यासाठी ह्या कृतिपुस्तिकेतील कृती निश्चीतच दिशादर्शक ठरतील असा विश्वास वाटतो.

कृतिपुस्तिकेमध्ये पाठ्यपुस्तकातील गद्य, पद्य, स्थूलवाचन, व्याकरण, उपयोजित लेखन व अपठीत गद्य या घटकांवरील कृतींचा (प्रातिनिधिक स्वरूपात) समावेश आहे. कृतिपत्रिकेमध्ये मूल्यमापनासाठी पूर्वज्ञानावर आधारित कृतींचा अंतर्भाव असावा. इ. १ ली ते ९ वी पर्यंतचे मूलभूत व्याकरण हे भाषिक विकासाच्या दृष्टीने उजळणी स्वरूपात अंतर्भूत असेल याची नोंद घ्यावी.

**महत्त्वाचे :-**

आजच्या दैनंदिन जीवनात संप्रेषणाचे महत्त्व व निकोप संप्रेषणाचे माध्यम म्हणून भाषेचे व्यावहारिक जीवनातील सामर्थ्य वादातीत आहे. आज मराठी भाषा सुद्धा व्यवसायाभिमुख म्हणून महत्त्वाची आहे. हे लक्षात घेऊन बदलत्या कृतिपत्रिकेमध्ये जवळ जवळ ५८% भारांश हा लेखनकौशल्यावर आहे. (उपयोजितलेखन) हे आवर्जून लक्षात घ्यावे.

कृतिपत्रिकेच्या आराखड्यातील (नमुना कृतिपत्रिकेनुसार) सर्व प्रकारच्या कृतींचा वैविध्याने समावेश आपल्या वर्गाध्यापनात करणेही गरजेचे आहे. यासाठीही शिक्षकांनी स्वत: जाणीवपूर्वक प्रयत्न करावे व कृती तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांनाही प्रेरित करावे. अध्यापन पद्धतीत सदर बदलानुसार बदल अपेक्षित आहेच. कृतिपत्रिकेमध्ये गद्य पद्याचे पाठ्यांश घटक मूल्यमापनासाठी अंतर्भूत असले तरी संपूर्ण पाठांचे अध्ययन–अध्यापन होणे अर्थातच महत्त्वाचे आहे.

परीक्षा पद्धतीतील तंत्र–मंत्र हस्तगत करुन भाषेत भरपूर गुण प्राप्त करणारे 'भाषापोपट' आपणास तयार करावयाचे नसून भाषिक, वाङ्मयीन जाण व समज असणारे भाषाप्रेमी 'भाषाभ्यासक' तयार करणे ही खरी गरजच या बदलाच्या स्वीकारामागील प्रमुख उद्देश आहे. कृतिपत्रिकेतील उताऱ्याचा अभ्यास करताना कृती पूर्ण करण्यासाठी उतारा काळजीपूर्वक वाचला तर काय महत्त्वाचे आहे ? काय नाही ? हे कळते. निवड करणे, वगळणे, असे संश्लेषण, विश्लेषण कौशल्यही प्राप्त होणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांना मिळालेल्या माहितीचे उपयोजन करता यावे. निरनिराळ्या लेखन प्रकारात त्याचा उपयोग करता यावा. ही कौशल्ये विद्यार्थ्यांना प्राप्त व्हावीत. हे कृतिपुस्तिकेतील कृतींच्या नियोजनाचे उद्दिष्ट आहे. केवळ पाठांतरापेक्षा प्रत्यक्ष उपाययोजनेला, कृतिशीलतेला संपूर्ण प्राधान्य देणाऱ्या या कृतींचा अभ्यास विद्यार्थ्यांना नक्कीच आनंददायी ठरेल.

मराठी विषयाचा भाषा म्हणून भाषिक समृद्धी व विकासासाठी अभ्यास, कृतिशील, आनंददायी स्वयंअध्ययनावर भर देणारी अध्यापनपद्धती आणि विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला, विचारशिलतेला, कृतिशीलतेला व महत्त्वाचे म्हणजे अभिव्यक्तीला पूर्णत: संधी देणाऱ्या या मूल्यमापन पद्धतीचा सकारात्मक स्वीकार आनंददायी अध्ययन आणि तणावमुक्त परीक्षा या दोहोंसाठीही फलदायी ठरेल असा विश्वास वाटतो.

ह्या सर्व बदलाच्या स्वीकारासाठी व कृतिप्रवणतेसाठी आपल्यातील सृजनशील शिक्षकाच्या प्रतिभेला मनापासून शुभेच्छा !

– डॉ. स्नेहा जोशी
सहनिमंत्रक
साहाय्य – मराठी विषय अभ्यास मंडळ व
संपादन समिती सदस्य

***

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 1. | प्रस्तावना | 03 |
| 2. | कृतिपत्रिका आराखडा | 07 |
| 3. | नमुना कृतिपत्रिका | 09-13 |
| 4. | कृतिपुस्तिका | |
| | विभाग १ – गद्य | 15-23 |
| | विभाग २ – पद्य | 24-27 |
| | विभाग ३ – व्याकरण | 28-29 |
| | विभाग ४ – उपयोजित लेखन | 29-30 |

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

कृतिपत्रिका आराखडा

**विषय – मराठी (संयुक्त भाषा)** (आंतरभारती)

इयत्ता १० वी

एकूण गुण – ४०

### विभाग १ – गद्य

**प्रश्न १ अ) गद्य उतारा (पठित) (६० ते ८० शब्द)**

(अपेक्षित कौशल्य – वाचन, आकलन, व्याकरण, अभिव्यक्ती)

| | | |
|---|---|---|
| १ | आकलन कृती | ३ |
| २ | व्याकरणाधारित कृती | १ |
| ३ | अभिव्यक्ती **(६ ते ८ वाक्य)** | २ |
| | | ६ गुण |

**प्रश्न १ ब) गद्य उतारा (पठित) (६० ते ८० शब्द)**

(अपेक्षित कौशल्य – वाचन, आकलन, व्याकरण, अभिव्यक्ती)

| | | |
|---|---|---|
| १ | आकलन कृती | ३ |
| २ | व्याकरणाधारित कृती | १ |
| ३ | अभिव्यक्ती **(६ ते ८ वाक्य)** | २ |
| | | ६ गुण |

**टीप – (गद्य विभागातील व्याकरणाधारित कृती इ. १ ली ते इ. ९ वीच्या अभ्यासक्रमातील व्याकरणाच्या घटकांवर आधारित असतील.)**

### विभाग २ – पद्य

**प्रश्न २ अ) कविता (पठित) (६ ते ८ ओळी)**

(अपेक्षित कौशल्य – वाचन, आकलन, अभिव्यक्ती)

| | | |
|---|---|---|
| १ | आकलन कृती | ३ |
| २ | अभिव्यक्ती **(६ ते ८ वाक्य)** | २ |
| | | ५ गुण |

**प्रश्न २ ब) कविता (पठित) (६ ते ८ ओळी)**

(अपेक्षित कौशल्य – वाचन, आकलन, अभिव्यक्ती)

| | | |
|---|---|---|
| १ | आकलन कृती | ३ |
| २ | अभिव्यक्ती **(६ ते ८ वाक्य)** | २ |
| | | ५ गुण |

## विभाग ३ – व्याकरण

**प्रश्न ३)** इ. १० वी च्या अभ्यासक्रमातील व्याकरणघटकांवर आधारित
व्याकरण-१/१ गुणांच्या ६ गुणांसाठी कृती

| | | |
|---|---|---|
| अ – | काळ ओळखा. | १ |
| ब – | काळ बदला | १ |
| क – | शब्दांचा योग्यक्रम लावून अर्थपूर्ण वाक्य तयार करा. | १ |
| ड – | लेखननियमांनुसार लेखन / अचूक शब्द ओळखा. | १ |
| इ – | वाक्प्रचार व त्याचे अर्थ | २ |

६ गुण

## विभाग ४ – उपयोजित लेखन

**प्रश्न ४)**

१ **पत्रलेखन** – अनौपचारिक पत्र ४

२ **कथालेखन** – कथापूर्ती/शब्दांवरुन/मुद्यांवरुन/शीर्षकावरुन कथालेखन. **(६० ते ८० शब्द)** ४

३ **निबंधलेखन (२ पैकी १)** – १.आत्मकथन २. वर्णनात्मक ३. स्वानुभव
यांपैकी कोणत्याही २ लेखनकृती कृतिपत्रिकेत देणे व त्यांपैकी १ सोडविणे अपेक्षित. ४
**(६० ते ८० शब्द)**

(व्याकरण आणि उपयोजितलेखन कृतींवर आधारित असेल.) १२ गुण

प्राश्निकांनी तीनही घटक विकल्पाने कृतिपत्रिकेत समाविष्ट करावेत.

| अ.क्र. | विभाग | गुण |
|---|---|---|
| १. | गद्य | १२ |
| २. | पद्य | १० |
| ३. | व्याकरण | ०६ |
| ४. | उपयोजित लेखन | १२ |
| | **एकूण** | ४० |

| | |
|---|---|
| **लेखी परीक्षा** | **४० गुण** |
| **तोंडी परीक्षा** | **१० गुण** |

- ✻ **तोंडी परीक्षेच्या प्रचलित पद्धतीत कोणताही बदल नाही.**
- ✻ **आवश्यकतेनुसार आराखड्यात बदल करण्याचा अधिकार अभ्यास मंडळाला राहील.**

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

**नमुना कृतिपत्रिका**

**विषय – मराठी – संयुक्त भाषा** (आंतरभारती)

वेळ - २ तास | इयत्ता १० वी | अंक - ४०

**विभाग १ – गद्य विभाग**

**प्रश्न १ अ) खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

१. i) चौकटपूर्ण करा. ०१

अमेरिकन पक्षिशास्त्रज्ञ स्टोक्स यांचा संशोधनाचा विषय
↓
[ ]

ii) कोण ते लिहा. ०२

चकोर पक्ष्याच्या आवाजाचे विविध प्रकार
↓
______ ______ ______

वन्य व पाळीव चकोराचा, अमेरिकन पक्षिशास्त्रज्ञ स्टोक्स यांनी संशोधनपर अभ्यास करुन, चकोर एकूण चौदा प्रकारचे आवाज करीत असल्याचा निष्कर्ष काढला. या विविध आवाजात भयसूचक, सादसूचक, व्यथादर्शक आवाजांचा समावेश होतो. उष्ण भागात एप्रिलच्या सुरुवातीस व हिमालयासारख्या शीत भागात जून–जुलैमध्ये यादी एखादी मोठी शिळा व झुडपांच्या आश्रयाने जमीन विखरुन त्यावर घरटे करुन सात ते बारा अंडी घालते. सिमला येथील फिझंट फार्ममध्ये चकोरी जून ते जुलै महिन्यात अंडी घालताना मी पाहिली. आपल्या प्राचीन ग्रंथांतून चकोराविषयी मोठी मनोरंजक, कुतूहल निर्माण करणारी माहिती आढळते.

२. खालील शब्दांना उताऱ्यात आलेले विरूद्‌धार्थी शब्द शोधून लिहा. ०१

i) लहान –

ii) थंड –

३. 'राष्ट्रीय पक्षी' या विषयावर ६ ते ८ वाक्यांत माहिती लिहा. ०२

**प्र. १ ब) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१. i) एका वाक्यात उत्तर लिहा. ०१

वैद्यकीय क्षेत्रातील चुंबकाचा मुख्य फायदा कोणता ?

ii) एका शब्दांत उत्तर लिहा. ०२

भंगार उचलण्यासाठी वापरले जाते ते ____________

प्रस्तुत उताऱ्यातील 'मी' कोण ? ____________

आजकाल तर लोक वैद्यकीय क्षेत्रांतसुद्धा माझा वापर मोठ्याप्रमाणात करु लागले आहेत. चुंबकीय माळ, चुंबकीय पट्टा, चष्मा बसविलेला ग्लास इ. वस्तुमुळे माणसाला रक्तदाब, सांधेदुखी, पचनसंस्थेचे विकार अशा असंख्य आजारांवर मात करता येते असे अनुभवानी सिद्ध झालेले आहे. मुख्य फायदा म्हणजे कोणताही दुष्परिणाम न होऊ देता ! कॉम्प्युटरची फ्लॉपी डिक्स, ऑडिओ कॅसेटची चेप यांच्यावर अत्यंत पातळ अशी चुंबकीय फिल्म (थर) लावलली असते. लोखंडाचा भंगार माल उचलण्यासाठी माझा उपयोग करुन बनविलेल्या चुंबकीय पारीचा उपयोग तर खूप वर्षापासून चालूच आहे. आजकाल या उपयोगांच्या जरुरीप्रमाणे मला विविध आकारात बनविले जाते.

२. विरूद्धार्थी शब्दांच्या योग्य जोड्या लावा. ०१

फायदा उपयोगी अविकारी

निरुपयोगी तोटा

| | |
|---|---|
| | |
| | |

३. तुम्हाला माहीत असलेले चुंबकाचे विविध उपयोग ६ ते ८ वाक्यांत लिहा. ०२

## विभाग २ – पद्य विभाग

**प्रश्न २ अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

१. i) रिकामी जागा भरा. ०१

| कवयित्रीने व्यक्त केलेला अभिमान | ____________ |
|---|---|

ii) शब्दजाल पूर्ण करा. ०२

भारतातील विभिन्नता दर्शविणाऱ्या बाबी

१. ________ २. ________ ३. ________ ४. ________

कुणी हिंदू वा मुसलमान कुणी शीख बौद्ध आहे.
अभिमान हा मला की मी भारतीय आहे.
भाषा नि वेशभूषा किती वेगळ्या निराळ्या !
प्रिय हीच एक भाषा मी भारतीय आहे.
नांदो विभिन्न राष्ट्रांतुन भिन्न वंश पंथ
ना खंत खेद मजला मी भारतीय आहे.
मी धर्मनिष्ठ परि मी धर्मान्ध खचित नाही
माणूस धर्म माझा मी भारतीय आहे.

२. कवितेतून व्यक्त होणारा भाव ६ ते ८ वाक्यांत तुमच्या शब्दांत लिहा. ०२

**प्र. २ ब) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

१. i) कोण ते लिहा. ०२

अ. चंचल मनाला रोखणारा - ________________

ब. भवसागर तरण्यास आवश्यक - ________________

ii) फक्त शब्दांत उत्तर लिहा. ०१

मन शुद्ध करणारे घटक - ____________ ____________

करावे ते मन आधी शुद्ध राया । भवाब्धी तराया पामर तो ।।
शुद्ध मन होय विवेकाचे योगे । आणिक, सत्संगे साधन हे ।।
विवेकाची छडी घेवोनिया करी । फिरवावे माघारी मन राया ।।
म्हणे तुकड्यादास मन ते चंचल । तयासी ओढील विवेक तो ।।

२. 'करावे ते मन आधी शुद्ध राया । भवाब्धी तराया पामर तो ।।' या काव्यपंक्तीचा तुम्हाला समजलेला अर्थ ६ ते ८ वाक्यांत सह स्पष्ट करा. ०२

## विभाग ३ – व्याकरण

**प्रश्न ३) कंसातील सूचनेनुसार कृती करा.**

अ) मी हिमालयातील जंगल पाहीन. (वाक्याचा काळ ओळखा.) ०१

ब) मला आज तुम्ही बोलावले आहे. (वाक्य भूतकाळी करा.) ०१

क) पुढील शब्दांचा योग्य क्रम जुळवून अर्थपूर्ण वाक्य तयार करा. ०१

i. कार्य येईल करता शिक्षणाने समाज जागृतीचे.

ii. टाकले तसे ठरवून मी मनोमन होते.

ड) लेखननियमांनुसार योग्य शब्द निवडा. ०१

i. पावूस / पाउस / पाऊस / पावुस

ii. आगस्ट / ऑगस्ट / ऑगस्त / अगस्ट

इ) कंसातील वाक्‌प्रचारांचा त्याखाली दिलेल्या वाक्यांत योग्य ठिकाणी वापर करुन वाक्ये पुन्हा लिहा. ०२

(कुतूहल वाटणे, गरुडझेप घेणे, नवल वाटणे)

i. एवढ्या लहान मुलीला सर्कशीचे खेळ करताना पाहून आम्हांला आश्चर्य वाटले.

ii. प्रतिकुल परिस्थितीतही साहिलने व्यवसायात खूप प्रगती केली.

## विभाग ४ – उपयोजित लेखन

**प्रश्न ४)** १. पत्रलेखन ०४

सूचना फलक वाचा व त्याखालील कृती सोडवा.




सूचना फलक

नव संस्कृती माध्यमिक विद्यालय, औरंगाबाद

विद्यार्थ्यांसाठी खूष खबर !

**'चलो - आनंदवन'**

सहल
दि. ५, ६ डिसेंबर

सहल प्रमुख
श्री. एम. आर. समुद्रे

नाव नोंदणी १६ ऑक्टोबर पूर्वी आवश्यक



| सहलीस चलण्याविषयी आग्रह करणारे पत्र मित्राला लिहा. | किंवा | सहलीस जाण्याची परवानगी मिळविण्यासाठी वडिलांना पत्र लिहा. |
|---|---|---|

२. कथालेखन (शब्दमर्यादा ६० ते ८० शब्द) ०४

खालील मुद्द्यांच्या आधारे कथा पूर्ण करा.

रामलाल एक श्रीमंत व्यापारी --- एकुलता एक मुलगा --- श्रीमंतीत वाढलेला --- हट्टी --- वाढदिवसाला गरीब मित्रांचे घरी येणे --- मुलगा नाराज --- वडिलांचे समजवणे --- 'पैशाच्या गरिबीपेक्षा मनाची श्रीमंती मोठी' --- मुलाला पश्चाताप --- मित्रांची माफी मागणे--- घट्ट मैत्री

३. निबंधलेखन – खालील पैकी कोणत्याही एका विषयावर निबंधलेखन करा. ०४

i) स्वानुभवलेखन किंवा प्रसंग लेखन (शब्दमर्यादा ६० ते ८० शब्द)

तुम्ही सुट्टीमध्ये तुमच्या मामाच्या गावाला (खेड्यात) गेला होता. तिथे घेतलेल्या अनुभवाचे वर्णन करा.



ii) खालील घटकाचे आत्मवृत्त लिहा. (शब्दमर्यादा ६० ते ८० शब्द) ०४



***

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

## विषय – मराठी (संयुक्त भाषा) (आंतरभारती)

इयत्ता १० वी – कृतिपुस्तिका

## विभाग १ – गद्य

### पाठ १ – भूईचाफा

गद्य उतारा – एका बागेत एक छान मोठे बकुळाचे झाड होते. ............... तो सतत आनंदात असे.

आकलन कृती :–

१) वैशिष्ट्य लिहा.

बकुळीच्या झाडाची वैशिष्ट्ये लिहा.

i) ______________ ii) ______________

२) कारण लिहा.

बकुळाला आनंद होण्याचे कारण लिहा. ______________________

माझा अभ्यास :–

१) पुढील शब्दांच्या अर्थाचा क्रमाने येणारा परिच्छेदातील शब्द शोधून लिहा.

तरु / वृक्ष / पादप ______________

२) सहसंबंध लिहा.

खूप : थोडे :: खाली : ______________

माझे मत :–

तुम्ही अनुभवलेल्या चांदण्यारात्रीचे वर्णन ६ ते ८ वाक्यांत लिहा.

सरावासाठी आकलनकृती :–

१) चौकट पूर्ण करा.

बकुळीच्या झाडाने पाहिलेल्या फुलाचे केलेले वर्णन लिहा.

i) ______________

ii) ______________

२) आकृती पूर्ण करा.

भूईचाफ्याच्या फुलाचे वैशिष्ट्य लिहा.

i) ______________

ii) ______________

व्याकरण : माझा अभ्यास

वर्गीकरण करा.

झाड  वाडा  पाकळी  आई  वारा

| स्त्रीलिंगी | पुलिंगी |
|---|---|
| | |

माझे मत :-

'माझी आई' विषयी ६ ते ८ वाक्यांत तुमचे विचार लिहा.

## पाठ २ – चकोर

गद्य उतारा – चकोर हा मृगयायोग्य पक्षी .................. कृषियोग्य भागातून हिंडता फिरताना हे पक्षी दिसून येतात.

आकलन कृती :-

१) उत्तर लिहा.

चकोरपक्षी प्रामुख्याने कोणत्या भागात फिरतो ? ______________________

२) चौकट पूर्ण करा.




३) चकोराच्या वर्णातील रंगांचे वैविध्य सांगा.

व्याकरण :- माझा अभ्यास

पुढील नामांची विशेषणे शोधून लिहा.

| नाम | विशेषण |
|---|---|
| टेकड्या<br>दगडगोटे<br>दरी | |

माझे मत :-

तुमच्या आवडत्या पक्षाचे वर्णन ६ ते ८ वाक्यांत लिहा.

सरावासाठी आकलन कृती :-

१) उत्तर लिहा.

चकोराचे औषधी उपयोगासाठी उपयुक्त घटक कोणते ?

२) वर्णन लिहा.

प्राचीन ग्रंथातून चकोराचे केलेले वर्णन – ____________________

माझा अभ्यास – व्याकरण

१) सहसंबंध लिहा.

पर्ण : पान :: कुसुम : [ ]

२) शब्दसमूहाबद्दल एक शब्द

चांदण्याने आनंदित होणारा पक्षी – [ ]

माझे मत :–

निसर्गातील पक्षीसृष्टी या विषयी ६ ते ८ वाक्यांत माहिती लिहा.

## पाठ ३ – सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक योगदान

गद्य उतारा – सावित्रीबाई लोककार्यातही जोतिरावांची अर्धांगी होत........ त्यांचा कटाक्ष होता.

आकलन कृती :–

१) उत्तर लिहा.

सावित्रीबाईंच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट कोणती ? ____________________

२) वैशिष्ट्ये लिहा.

सावित्रीबाई फुले यांची स्वभाव वैशिष्ट्ये लिहा.

i) ____________________ ii) ____________________

iii) ____________________ iv) ____________________

माझा अभ्यास – व्याकरण

रिकाम्या जागा भरा.

शिक्षणाविषयी उताऱ्यात आलेली क्रियापदे शोधून लिहा.

i) __________ ii) __________ iii) __________

माझे मत :–

१) तुम्हास माहीत असलेल्या चार समाजसुधारकांची नावे लिहा.

२) कोणत्याही एका समाजसुधारकाच्या कार्याविषयी ६ ते ८ वाक्यांत माहिती लिहा.

सरावासाठी आकलनकृती

उत्तर लिहा.

१) सावित्रीबाईंनी संजीवनी मंत्र दिलेले घटक कोणते ? i) __________ ii) __________

२) सावित्रीबाईंच्या विचाराचे लेखकाने केलेले वर्णन i) __________ ii) __________

माझा अभ्यास - व्याकरण

पुढील आकृतीत दिलेल्या शब्दांची योग्य जुळणी करून अर्थपूर्ण वाक्ये तयार करा.

| | | | |
|---|---|---|---|
| कार्य | येईल | शिक्षणाने | शिकला |
| सावित्रीबाई | समाजजागृतीचे | स्वतः | करता |

i) ____________ ii) ____________

माझे मत :-

१) तुमच्या शाळेत राबविल्या जाणाऱ्या कोणत्याही एका शैक्षणिक उपक्रमाचे ६ ते ८ वाक्यांत वर्णन लिहा.

२) सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाविषयी केलेले कार्य ६ ते ८ वाक्यांत लिहा.

## पाठ ४ - परोपकर

गद्य उतारा - मुरली जणू गावाची काठी झाला होता. ....... कष्टी व्हायचा.

आकलन कृती :-

१) एका वाक्यात उत्तर लिहा. ____________

मुरलीचे काम करण्याविषयीचे तत्त्वज्ञान सांगा.

२) आकृती पूर्ण करा.

मुरली ~~करीत असलेली कामे~~ - ____________

i) ____________ ii) ____________

iii) iv)

माझा अभ्यास - व्याकरण

समानार्थी शब्द द्या.

i) संचार - ii) मयत -

माझे मत :-

तुम्ही आतापर्यंत परोपकाराची केलेली चार - पाच कामे लिहा.

सरावासाठी आकलन कृती :-

१) वैशिष्ट्ये लिहा.

मुरलीच्या घड्याळाची वैशिष्ट्ये लिहा.

२) एका वाक्यात उत्तर द्या.

मुले करमाडला शिकायला का जात ?

माझा अभ्यास – व्याकरण

१. 'झपझप' यासारखे आणखी दोन शब्द लिहा.

२. वचन ओळखा.

| नाम | वचन |
|---|---|
| पाहुणा | |
| माणसे | |
| घड्याळे | |
| रस्ता | |

माझे मत :–

तुमच्या गावातील मुरली सारख्या व्यक्तीचे वर्णन ६ ते ८ वाक्यांत लिहा.

## पाठ ५ – शाळेचा गणवेश

गद्य उतारा – मग दुसऱ्या दिवशी मी सहा किलोमीटर पायी चालत ........... चारशे शाळा आहे.

आकलन कृती :–

१) असत्य विधान ओळखा.

अ. हायस्कूलला स्वतंत्र इमारत नव्हती.

ब. शाळा रयत शिक्षण संस्थेची होती.

क. शाळेच्या ४०० शाळा हेत्या.

ड. शाळेचे वर्ग वेगवेगळे भरत.

२) मुख्याध्यापकांच्या कार्यालयाचे विशेष लिहा.

i) ______________________

ii) ______________________

३) रयत शिक्षण संस्थेचा विस्तार खूप मोठा होता. हे कोणत्या वाक्यावरुन अधोरेखित होते ?

माझा अभ्यास :– व्याकरण

उताऱ्यातील एक भूतकाळाचे  व एक वर्तमान काळाचे वाक्य शोधून लिहा.

माझे मत :–

'स्वावलंबी शिक्षण हेच आमचं ब्रीद' या उक्तीचा तुम्हाला समजलेला अर्थ ६ ते ८ वाक्यांत लिहा.

सरावासाठी आकलन कृती :–

१) आकृतिबंध (वेब) पूर्ण करा.

रयत शिक्षण संस्था

संस्थापक | ध्येयवाक्य | कार्यक्षेत्र

२) i) एका वाक्यात उत्तर लिहा.

लेखकाला शिक्षकांनी कोणती मदत केली ?

ii) कारण लिहा.

लेखकाने पुढे शिकणे नाकारले कारण ......................

माझा अभ्यास – व्याकरण

१) खालील वाक्यातील काळ ओळखा व वाक्याचा काळ बदलून वाक्य पुन्हा लिहा.

मला आज तुम्ही बोलाविले आहे.

२) शब्दांचा योग्य क्रम जुळवून अर्थपूर्ण वाक्य तयार करा.

मी मनोमनी ठरवून तसे होते टाकले.

माझे मत :–

तुमच्या शालेय जीवनातील अविस्मरणीय प्रसंग लिहा. (६ ते ८ वाक्यांत)

## पाठ ६ – माझा जंगल प्रवास

गद्य उतारा – फागूच्या भोवताल कोसनकोस .......... स्वतःत सामावून घेणारी ती शिखरे.

आकलन कृती :–

१) वैशिष्ट्ये लिहा.

हिमालयाची शिखरे लेखकाला अशी वाटली.

i) ______ ii) ______ iii) ______ iv) ______

२) कोण ते लिहा.

i) फिकी, मुकी, बर्फ ______ ii) उजाड, उघडे, बोडके ______

३) योग्य पर्याय निवडून लिहा.

i) को– फ्लायचं अंतर .............. होतं.

(१ किलोमीटर / २०० मीटर / मैलोंगणती / २ मैल)

माझा अभ्यास – व्याकरण

प्रत्येक शब्दाला किमान दोन समानार्थी शब्द सांगा

i) आकाश – ________ ________ ii) घर – ________ ________

माझे मत :–

तुम्ही केलेल्या अविस्मरणीय प्रवासाचे वर्णन ६ ते ८ वाक्यांत लिहा.

सरावासाठी आकलन कृती :–

१) आकृतीबंध पूर्ण करा.

लेखकाच्या जंगल प्रवासातील स्थळे

| | | |
|---|---|---|
| | | |

२) हिमालयातील वनस्पती

i) ______________ ii) ______________

iii) ______________ iv) ______________

३) एका शब्दात उत्तर द्या.

i) लेझर हिमालयाला सुरूवात कोठून होते ? [ ]

ii) जादूचा पुरुष कोणाला म्हटले आहे ? [ ]

माझा अभ्यास – व्याकरण

१) विरुद्धार्थी शब्द द्या.

i) सुंदर – __________ ii) उशिरा – __________

२) खालील वाक्यातील काळ ओळखा व काळ बदलून वाक्य पुन्हा लिहा.

मी हिमालयातील जंगल पाहिले.

माझे मत :–

'माझा जंगल प्रवास' तुम्ही केलेल्या जंगल प्रवासाचे (काल्पनिक) वर्णन तुमच्या शब्दांत लिहा. (६ ते ८ वाक्यांत)

## पाठ ७ – मी आहे लोहचुंबक

गद्य उतारा – सर्व पदार्थांवर माझा परिणाम होत नाही ...... हा जगातला पहिला कायमचा लोहचुंबक

आकलन कृती :–

१) तुलना करा.

| चुंबकीय पदार्थ | अचुंबकीय पदार्थ |
|---|---|
| | |

२) उत्तर लिहा.

i) जगातला पहिला कायमचा लोहचुंबक – ______________

ii) पूर्वीच्या लोकांना ज्ञात असलेली गोष्ट – ______________

३) चुकीचा पर्याय निवडा.

लोखंड / निकेल / स्टोन / कोबाल्ट

माझा अभ्यास – व्याकरण

चौकटीत लिहा.

खालील वाक्यातील विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे लिहा.

ज्या पदार्थांना मी आकर्षित करतो, त्यांना 'चुंबकीय पदार्थ' असे म्हणतात.

| | विरामचिन्हे – | नांव |
|---|---|---|
| i) | | |
| ii) | | |
| iii) | | |

माझे मत :– तुम्हाला माहीत असलेली चुंबकाची इतर चार वैशिष्ट्ये लिहा.

## पाठ ८ – झडीचा पाऊस

गद्य उतारा – आपल्या सिमेंट–कॉंक्रीटच्या घराच्या खिडकीतून दुसऱ्याच्या ................ ते ही नकोसंच होतं.

आकलनकृती :–

१) उत्तर लिहा.

i) माणसाला जीवनही नकोसे केव्हा होते ?

ii) सुंदर पाऊसही सुंदर केव्हा वाटत नाही ?

२) दूर कुठ तरी पडणारा पाऊस कसा सुंदर वाटतो ?

३) अतिपावसामुळे होणारे दुष्परिणाम लिहा.

माझा अभ्यास :– व्याकरण

वाक्यातील वाक्प्रचार ओळखून अर्थ लिहा व त्याचा दुसऱ्या वाक्यात उपयोग करा.

त्याच्या हैदोस घालण्याविषयी आपल्याला चिड आहे.

| वाक्प्रचार | अर्थ |
|---|---|
| | |
| | |

माझे मत :– 'मी अनुभवलेला पाऊस' या विषयांवर ६ ते ८ वाक्यांत तुमचा अनुभव लिहा.

सरावासाठी आकलन कृती :-

१) योग्य पर्याय निवडून रिकामी जागा भरा.

पावसाने कंटाळलेली कुणी पडक्या देवळाच्या ................ जाऊन बसत.

(मंडपात / परिसरात / घुमटाखाली / गाभाऱ्यात)

२) उत्तर लिहा.

पाऊस आवडणारी माणसे कशी असतात ?

i) ——— ii) ——— iii) ——— iv) ———

३) प्रमाणभाषेत भाषांतर करा.

'भलताच रंजीस करी ऱ्हायना मरो ! '

माझा अभ्यास :- व्याकरण

१) वचन बदला.

i) पाऊस- ———— ii) गाव - ————

२) खालील अनेकवचनी नामाची एकवचनी रुपे सांगा व ती वाक्यांत वापरुन वाक्ये लिहा.

i) लिंबे - ii) नद्या - iii) विटा -

३) अचूक शब्द ओळखा.

i) सुंदर / सुन्दर / सुनदर / सुदंर

ii) कवचित / कवचीत / क्वचित / क्वचीत

माझे मत :-

'पावसाची विविध रुपे' या विषयांवर आपले विचार ६ ते ८ वाक्यांत लिहा.

## विभाग २ – पद्य

### पाठ १ – ऐसे केले या गोपाळे

१) वैशिष्ट्ये लिहा.

फणस
i) ______ ii) ______

नारळ
i) ______ ii) ______

२) रिकाम्या जागा भरा.

i) चुकीच्या परंपरा दूर करणारा – [ ]

ii) ह्रदयांत परमेश्वराला स्थान देणारा – [ ]

iii) कान टोचलेले नाही असा – [ ]

३) 'फणसा अंगी काटे आत अमृताचे साठे' या काव्यपंक्तीचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.

सरावासाठी :–

१) कृती सोडवा.

अभंगात उल्लेख आलेली वृक्षसंपदा

i) ______ ii) ______ iii) ______

२) चौकट पूर्ण करा.

संत शेख महंमद यांनी परमेश्वराला कोणाच्या उपमा दिल्या?

i) [ ] ii) [ ] iii) [ ]

३) संबोध स्पष्ट करा.

अविंध

माझे मत :–

अभंगातील तुम्हाला आवडणारी पंक्ती कोणती ? सकारण स्पष्ट करा.

### पाठ २ – करावे ते मन आधी शुद्ध राया

१) एका वाक्यात उत्तर लिहा.

मनावर नियंत्रण कसे ठेवावे ?

२) रिकाम्या जागा भरा.

........... , ................. यांमुळे मन शुद्ध होते.

माझे मत :–

अभंगात सांगीतलेले 'विवेकाचे' महत्त्व तुमच्या शब्दांत ६ ते ८ वाक्यांत लिहा.

सरावासाठी :– १) योग्य पर्याय निवडून लिहा.

i) चंचल मनाला आवर घालणारा घटक ................ (विवेक / सौंदर्य / शरीर / बुद्धी)

ii) कवीच्या मते मन ............. असावे. (सत्संगी / शुद्ध / चंचल / विवेकी)

माझे मत –

i) ‘चंचल मनास आवर घालण्यास आवश्यक कृती’ ६ ते ८ वाक्यांत लिहा.

ii) ‘मन अत्यंत चंचल असते’ हे विधान तुमच्या अनुभवाच्या आधारे स्पष्ट करा.

## पाठ ३ – गाणारे हात

१) चौकट पूर्ण करा.




२) कोष्टक पूर्ण करा.




माझे मत :-

कवीतेत गाणाऱ्या, धडपडणाऱ्या हातांचे सांगितलेले महत्त्व तुमच्या शब्दांत सांगा.

सरावासाठी :-

१) वैशिष्ट्ये लिहा.




माझे मत :-

१) कवितेच्या अर्थाच्या आधारे ‘सुंदरमन’ याविषयी तुमचे विचार लिहा.

२) रिकाम्या जागा भरा.

i) विणकऱ्याचे हात ______________

ii) कष्टकऱ्याचे हात ______________

## पाठ ४ – वसंत ऋतूचे गाणे

१) कृती सोडवा.

वसंतऋतूची जाणीव करुन देणाऱ्या गोष्टी

i) ——— ii)——— iii) ——— iv) ———

२) परिणाम लिहा.

खालील घटकांवर वसंतऋतुच्या आगमनाचा होणारा परिणाम लिहा.

| घटक | परिणाम |
|---|---|
| आंब्याचे झाड | ___________ |
| भ्रमर | ___________ |
| कोकिळ | ___________ |
| पक्षी | ___________ |

माझे मत :-

वसंत ऋतुचे वेगळेपण तुमच्या शब्दांत लिहा.

सरावासाठी :-

१) योग्य जोड्या जुळवा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| i) वेल | i) वातावरणात शीळ उमटणे |
| ii) भुंगा | ii) आनंदाने गाणे |
| iii) कोकिळ | iii) गाणे गाणे |
| iv) पक्षी | iv) फुलून येणे |

माझे मत :-

तुमच्या आवडत्या ऋतुची वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत लिहा.

## पाठ ५ – मी भारतीय आहे.

१) चौकट पूर्ण करा.

कवयित्रीचा

अभिमान — [ ]

धर्म — [ ]

२) वैशिष्ट्ये लिहा.

कवितेत आलेली भारतीयांची वैशिष्ट्ये

i) ________ ii) ________ iii) ________ iv) ________

माझे मत :-

‘भारतात विविधतेत एकता आहे’ हे विधान तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

सरावासाठी :-

१) योग्य पर्याय निवडून लिहा.

i) अभिमान हा मला की मी ...................... आहे.
(स्वकीय / भारतीय / देशीय / परदेशीय)

ii) मी धर्मनिष्ठ परि मी धर्मान्ध .................. नाही.
(खचित / क्वचित / निश्चित / नक्कीच)

माझे मत :-

‘माणूस धर्म माझा मी भारतीय आहे.’ या ओळीचा अर्थ तुमच्या विचारांनी स्पष्ट करा.

## विभाग ३ – व्याकरण

अ) **काळ ओळखा.**

खालील वाक्यांचा काळ ओळखा.

१) मला दोन पुस्तके हवी होती.

२) मी खात्रीने पास होईन.

३) इतके मोठे फूल कोठेही नाही.

४) चकोराचे पाय लाल रंगाचे असतात.

ब) **काळ बदला.**

१) सुचनेनुसार कृती करा.

i) विद्येनेच परिस्थितीवर मात करता येते. (भविष्यकाळ करा.)

ii) मी तुझ्या युनिफॉर्मची व्यवस्था करुन ठेवली आहे. (भूतकाळ करा.)

२) कोष्टक पूर्ण करा.

खालील धातूंची तीन काळातील रुपे तक्त्यांत लिहा.

| वाक्य | धातू | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|---|
| शकिला खेळ | खेळणे. | | | खेळेन. |
| इस्माईल | जेवणे. | जेवतो. | | |

क) **शब्दांचा योग्य क्रम लावून अर्थपूर्ण वाक्य तयार करा.**

खालील वाक्यांतील शब्दांचा योग्यक्रम लावून वाक्ये पुन्हा लिहा.

१) नाहीस तू गेला गावाला –

२) समाधान झाले बकुळाचे आता –

३) मनोमनी ठरवून मी तसे होते टाकले –

ड) **लेखननियमांनुसार लेखन.**

१) पुढील शब्द लेखननियमांनुसार लिहा.

i) परीक्षा / परिक्षा / परइक्षा / परीक्क्षा    ii) हारदिक / हार्दिक / हार्दीक / हादीर्क

iii) जमीन / जमिन / जमिण / जिमिन

२) खालील वाक्यांतील चुकीचे शब्द शोधून वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.

i) कुतूहल र्निमाण करणारी माहीती आढळते.

ii) शीक्षणाने माणुस शहाणा बनतो.

इ) **वाक्प्रचार व त्याचे अर्थ.**

१) पुढील वाक्यात योग्य तो वाक्प्रचार योजून वाक्य पुन्हा लिहा.

i) चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक आल्यामुळे सुश्रुतला खूप आनंद झाला.

ii) आपला प्रवासास जाण्याचा बेत रद्द झाला हे ऐकून समीरला वाईट वाटले.

२) वाक्प्रचार व त्याचा अर्थ यांच्या योग्य जोड्या लावा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. गरुड झेप घेणे | निश्चय करणे |
| २. वाऱ्यावर सोडणे | आधार देणे |
| ३. धीर देणे | खूप प्रगती करणे |
| ४. मनोमन ठरविणे | दुर्लक्ष करणे |

## विभाग ४ – उपयोजित लेखन

१) **पत्रलेखन**

शालेय फलकावरील बातमी वाचून त्याखालील कृती करा.

न्यू इरा माध्यमिक शाळा नवेगाव
**अभिनंदनीय ! अभिनंदनीय !!**
'स्वच्छ सुंदर शाळा' उपक्रमात
आपल्या शाळेला प्रथम क्रमांक प्राप्त
संस्था प्रतिनिधींकडून सर्वांचे अभिनंदन !

वरील माहितीच्या आधारे

१) उपक्रमाच्या गटप्रमुखाला त्यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

२) सदरची बातमी तुमच्या मित्र-मैत्रिणीला सांगणारे पत्र लिहा.

२) **कथालेखन**

१) खालील अपूर्ण कथा तुमच्या कल्पनेने पूर्ण करा. (शब्दमर्यादा ६० ते ८० शब्द)

सलमाचा निकाह म्हणून घरात सगळ्यांच्या आनंदाला अगदी उधाण आले होते. सर्वांची गप्पांची मैहफील जमली होती. प्रत्येक जण काहीना काही तरी करीत होता. कुणी गाणे म्हटले, कुणी विनोद सांगीतले, कुणी सलमाची फिरकी घेत होते. सर्व वातावरण अत्यंत आनंदी होते. तेवढ्यात सलमाचा मोठा भाऊ इरफान आला, त्याने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले आणि म्हणाला.......................

२) खालील मुद्द्यांच्या आधारे कथालेखन करा.

शाळेचा क्रीडा महोत्सव – धावण्याची स्पर्धा – इ. ९ वीतील रेहाना व इ. १० वी तील सकिना दोघींचाही सहभाग – जिंकण्यासाठी खूप सराव – दोघींमध्ये चुरस – स्पर्धा सुरू – अचानक रेहानाचा पाय मुरगळणे – रेहाना मैदानात पडणे – सकिनाची स्पर्धा सोडून रेहानाला मदत – तिचे रेहानाला घेऊन स्पर्धा पूर्ण करणे – सर्वांकडून सकिनाचे कौतुक – स्पर्धेपेक्षा, ईर्षेपेक्षा माणुसकी महत्त्वाची.

३) **निबंधलेखन**

**१) आत्मकथन**

खालीलपैकी कोणत्याही एका घटकाचे आत्मवृत्त लिहा.

१) 

२) 

**२) वर्णनात्मक**

१) खालील मुद्द्यांच्या आधारे निबंध लिहा.

पावसातील अविस्मरणीय अनुभव

पावसाळ्याचे दिवस ......... पावसाळ्यातील निसर्ग ......... आजूबाजूची परिस्थिती ......... तुम्ही अनुभवलेला अविस्मरणीय क्षण .......... त्याबाबतच्या तुमच्या भावना.

**३) प्रसंगलेखन / स्वानुभवलेखन**

इ. १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी शाळेने शुभेच्छा समारंभ आयोजित केला होता. त्या कार्यक्रमाला तुम्ही इ. १० वी चा विद्यार्थी म्हणून उपस्थित होता. तुम्ही अनुभवलेल्या त्या भावपूर्ण प्रसंगाचे तुमच्या शब्दांत वर्णन करा.

***

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

विषय : मराठी – संयुक्त भाषा (आंतरभारती) (इ. १० वी)
प्रती : २००० । मुद्रक : समर्थ ऑफसेट, पुणे ४११०५२.